# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.11.2025** **वार:बुधवार**

1. अयोध्येतील श्री राम जन्मभूमी मंदिरावर पंतप्रधानांच्या हस्ते धर्मध्वजारोहण
2. हा धर्म ध्वज भारतीय संस्कृतीच्या पुनरुत्थानाचं प्रतिनिधित्व करत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. देशभरात आज संविधान दिनानिमित्त विविध कार्यक्रम
4. अद्याप निवडणुका जाहीर न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडू नका- सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि
5. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या क्रिकेट कसोटीतील विजयासाठी भारतासमोर 549 धावांचं आव्हान

**पंतप्रधान-अयोध्या**

उत्तर प्रदेशमध्ये अयोध्येतील श्री राम जन्मभूमी मंदिराच्या शिखरावर काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहण झालं. हे ध्वजारोहण मंदिर निर्माणाचं काम पूर्ण झाल्याचं आणि राष्ट्रीय एकतेचं तसंच नव्या सांस्कृतिक पर्वाचं प्रतीक आहे. हा ध्वज भारतीय संस्कृतीच्या पुनरुत्थानाचं प्रतिनिधित्व करत आहे. अंतिम विजय सत्याचाच होतो हेच हा पवित्र ध्वज दाखवून देत असल्याचं सांगून पंतप्रधान म्हणाले....

**आज अयोध्या नगरी भारत की सांस्कृतिक चेतना के एक और उत्कर्ष बिंदु की साक्षी बन रही है। आज सम्पूर्ण भारत, सम्पूर्ण विश्व, राममय है। हर रामभक्त के हृदय में अद्वितीय संतोष है, असीम कृतज्ञता है, अपार अलौकिक आनंद है। सदियों के घाव भर रहे हैं, सदियों की वेदना आज विराम पा रही है, सदियों का संकल्प आज सिद्धि को प्राप्त हो रहा है। आज उस यज्ञ की पूर्णाहुति है, जिसकी अग्नि 500 वर्ष तक प्रज्वलित रही।**

उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत कार्यक्रमाला उपस्थित होते. जय श्री रामच्या जयघोषात, शंखध्वनीच्या निनादात आणि अभिजीत मुहूर्तावर संपन्न झालेल्या या ध्वजारोहण सोहोळ्याला जगभरातून हजारो राम भक्त उपस्थित राहिले होते.

**पंतप्रधान-कुरूक्षेत्र**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल कुरूक्षेत्रावर पांचजन्य स्मारकाचंही अनावरण झालं. कुरूक्षेत्राच्या याच भूमीवरुन भगवान श्रीकृष्णानं सत्य आणि न्यायाचं रक्षण हे मनुष्याचं परमकर्तव्य असल्याचा संदेश जगाला दिला होता याची आठवण पंतप्रधानांनी करुन दिली. शीख धर्मियांचे गुरू तेगबहादूर यांच्या साडे तीनशेव्या जयंतीनिमित्त कुरूक्षेत्र इथं आयोजित कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते विशेष नाणं आणि टपाल तिकीटाचं अनावरण करण्यात आलं. शिखांचे गुरू श्री तेग बहादूर जी यांनीही सत्य, न्याय आणि धर्माचं रक्षण हेच आपलं कर्तव्य मानून आपलं अवघं जीवन त्यासाठी समर्पित केलं. असं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**संविधान दिवस**

देशभरात आज संविधान दिवस साजरा केला जाणार आहे. हमारा संविधान हमारा स्वाभिमान ही यंदाच्या संविधान दिवसाची संकल्पना आहे. नवी दिल्लीत संविधान सदनाच्या मध्यवर्ती सभागृहात होणाऱ्या मुख्य सोहोळ्यात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि संसदेतील खासदार सहभागी होतील.

संविधान दिवसानिमित्त आज देशभरातल्या अनेक शहरांमध्ये, गावांमध्ये संविधानाच्या प्रस्तावनेचं वाचन केलं जाणार आहे. या कार्यक्रमात राज्यघटनेच्या मराठीसह 9 भाषांमधल्या अनुवादाचं प्रकाशन केलं जाणार आहे. राज्यातही विविध सरकारी कार्यालयांमध्ये तसंच शाळा, महाविद्यालयात व्याख्यान, संविधान वाचन, संविधान दिंडी इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**<u>सर्वोच्च न्यायालय</u>**

राज्यातल्या ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं आरक्षणाची 50 टक्के मर्यादा ओलांडू नका, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयानं काल निवडणूक आयोगाला केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये 50 टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात असल्याप्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठासमोर काल सुनावणी झाली. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाशी चर्चा सुरू असल्याची माहिती राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयाला दिली. त्यानंतर पीठानं या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारपर्यंत पुढे ढकलली. 2 डिसेंबर रोजी होणाऱ्या 242 नगरपरिषदा आणि 42 नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये 57 संस्थांमध्ये आरक्षणाची कमाल मर्यादा ओलांडली जात असल्याची माहिती निवडणूक आयोगाचे वकील बलबीर सिंह यांनी दिली. त्यावर, या प्रकरणाच्या निकालावर हे अतिरिक्त आरक्षण अवलंबून असेल, अशी तोंडी टिप्पणी सरन्यायाधीशांनी केली.

**<u>मुख्यमंत्री</u>**

समाजप्रबोधन आणि राष्ट्राच्या उभारणीत संतांचं मोठं योगदान आहे,असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल वेरुळ इथं व्यक्त केलं. संत जनार्दनस्वामी यांच्या वेरुळमधल्या आश्रमात आयोजित ॐ जगद्गुरू जनशांती धर्म सोहळ्याला मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>अभिवादन</u>**

राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल राज्यभरातून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यशवंतरावांच्या कार्याला उजाळा देत, त्यांच्या स्मृतीला अभिवादन केलं.

**<u>26/11</u>**

26/11 च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील हुतात्म्यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय सुरक्षा दल अर्थात एनएसजीतर्फे आज गेट वे ऑफ इंडिया इथं एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अशा प्रकारचे हल्ले पुन्हा होऊ नयेत यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी केला जाणार आहे. मुंबईतल्या 11 महाविद्यालयं आणि 26 शाळांमधले विद्यार्थी या शपथग्रहण कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

**<u>शिष्यवृत्ती परीक्षा</u>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणारी प्राथमिक आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा आता 22 फेब्रुवारी 2026 रोजी राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. ही परीक्षा आधी 8 फेब्रुवारी रोजी होणार होती, मात्र राज्यातील अनेक प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षक त्या दिवशी होणारी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा देणार असल्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षेच्या तारखेत बदल केल्याचं महाराष्ट्र परीक्षा परिषदेनं कळवलं आहे.

**<u>टीईटी पेपरफुटी</u>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत नुकत्याच घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेतल्या पेपरफुटीच्या वृत्ताचं महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी खंडन केलं आहे. राज्यभरातून कोणत्याही ठिकाणाहून प्रश्नपत्रिकांची गाडी सीलबंद नसल्याबाबत अथवा गोपनीय प्रश्नपत्रिकांचे बॉक्सेस अथवा पाकिटे सीलबंद नसल्याची तक्रार

आलेली नाही असं त्यांनी सांगितलं. एका वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगानं परिषदेकडून हे स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

**<u>समता पुरस्कार</u>**

यंदाचा समता पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत आणि अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना देण्यात येणार आहे. महात्मा फुले यांची 135 वी पुण्यतिथी आणि समता दिनानिमित्त येत्या शुक्रवारी पुण्यात हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार असल्याची माहिती अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेनं काल पत्रकार परिषदेत दिली.

**<u>गडपदभ्रमंती-कोल्हापूर</u>**

कोल्हापूर इथल्या राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसी गट मुख्यालयातर्फे आयोजित पन्हाळा ते विशाळगड पदभ्रमंती मोहीमेला काल सुरुवात झाली. एनसीसीच्या महाराष्ट्र संचालनालयाचे अतिरिक्त महानिदेशक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी झेंडा दाखवून या छत्रपती शिवाजी महाराज पदभ्रमंती मोहीमेचा प्रारंभ केला. येत्या 4 डिसेंबर पर्यंत सुरु राहणाऱ्या या मोहीमेत 12 राज्यातील विद्यार्थी टप्प्याटप्प्याने सामील होणार आहेत.

**<u>सज्जनगड संस्थान</u>**

श्री रामदास स्वामी संस्थानच्या वतीने यावर्षीचा श्री समर्थ चरण पादुका प्रचार दौरा आजपासून येत्या 28 जानेवारीपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. सातारा आणि पुण्यासह नंदुरबार, अमळनेर, चाळीसगाव, अहिल्यानगर या शहरांमध्ये समर्थांच्या चरण पादुकांचं आगमन होणार आहे. यादरम्यान श्री क्षेत्र सज्जनगडावर होणारे दैनंदिन कार्यक्रम पादुकांच्या मुक्कामाच्या ठिकाणी होणार असल्याचं संस्थाननं कळवलं आहे.

**<u>खेलो इंडिया</u>**

राजस्थानमध्ये होत असलेल्या पाचव्या विद्यापीठस्तरीय खेलो इंडिया स्पर्धेत कालचा पहिलाच दिवस महाराष्ट्राच्या मुलींनी गाजवला. सांगलीच्या काजोल सनगरनं भारोत्तोलनात महिलांच्या 48 किलो गटात 158 किलो वजन उचलत सुवर्णपदक मिळवलं. महिलांच्या वैयक्तिक टाइम ट्रायल सायकलिंग स्पर्धेत आहिल्यारनगरच्या अपूर्वा गोरेनं कांस्यपदक मिळवलं. देशातल्या 222 विद्यापीठांमधले 4 हजार 448 खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतानं दोन गडी बाद 27 धावा केल्या. कालचा खेळ संपला तेव्हा साई सुदर्शन 2 तर कुलदीप यादव 4 धावांवर खेळत होते. तत्पूर्वी दक्षिण अफ्रिकेनं आपला दुसरा डाव 260 धावांवर घोषित केला आणि भारतासमोर विजयासाठी 549 धावांचं मोठं लक्ष्य ठेवलं.

**<u>हवामान</u>**

राज्यातला थंडीचा जोर काहीसा कमी झाला असून काल सर्वात कमी किमान तापमान ब्रम्हपुरी इथं 14 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.